# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०२६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

## मुंबई शहर व उपनगरामधील बहुतांश उड्डाणपूल, पादचारी पूल, स्कायवॉक, सब वे यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) १०५५ (१७-०४-२०२५) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये शहर व उपनगरातील उड्डाणपूल, पादचारी पूल, स्कायवॉक, सबवे यापैकी बहुतांश उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, सब-वे यांची दुरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक, सब वे ची मोठ्या प्रमाणात करावयाची तातडीची दुरुस्ती निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२४-२५ मध्ये रस्ते, वाहतूक आणि पूल या विभागांसाठी निधीची तरतूद केली असताना सदर निधी फक्त नवीन कामांसाठी वापरला जात असून जुन्या कामांसाठी या निधीचा वापर केला गेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मुंबई शहर व उपनगरामधील बहुतांश उड्डाणपूल, पादचारी पूल, स्कायवॉक, सबवे यांची झालेली दुरवस्था दुर करण्याच्या दृष्टीने सदर कामांच्या दुरुस्ती देखभालीकरीता तातडीने निधी उपलब्ध व्हावा यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१),(२) व (३) हे खरे नाही.
(४) सन २०२४-२५ या वर्षाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे व शहर येथील उड्डाणपूल, पादचारी पूल, स्काय वॉक व सब-वे यांच्या दुरूस्तीकरीता रुपये ८९.०५ कोटी इतका निधी खर्च करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईत म्युझिक स्टुडिओची तोडफोड करण्यात आल्याबाबत

**(२) २५५३ (१७-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कॉमेडियन कुणाल कामरा यांनी आपल्या पॅरीडी साँगमधून स्टँडअप टिका केल्यानंतर हॉटेल युनी कॉन्टीनेन्टल येथील त्यांच्या स्टुडिओची तोडफोड करण्यात आली असल्याची बाब माहे मार्च,-२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी यापूर्वी अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा भंग झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींवर गुन्हा दाखल करुन नुकसान भरपाई वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (११-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

दिनांक २३/०३/२०२५ रोजी युनिकॉन्टीनेन्टल हॉटेल,खार (प.),मुंबई येथे बेकायदेशीररित्या प्रवेश करुन चिथावणीखोर भाषणाद्वारे प्रक्षोभक जमाव जमवून सदर हॉटेलमधील साहित्याचे नुकसान केल्याने तसेच पोलीस कर्तव्यात अडथळा आणल्याने आरोपित राहुल कनाल,कुनाल सरमळकर तसेच अक्षय पनवेलकर व इतर १५ ते २० अनोळखी आरोपितांविरुध्द खार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१९३/२०२५ भा.न्या.संहितेच्या कलम १३२, १८९(२), १८९(३), १९०, १९१(२), ३२४(५)(६), २२३, ३५१(२), ३५२, ३३३ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१), १३५ अन्वये दिनांक २४/०३/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरु आहे.

(२) यापूर्वी खार पोलीस ठाणे अभिलेखावर स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याचे अभिव्यक्ति स्वातंत्र्यांचा भंग झालेबाबत गुन्हा दाखल नाही.

(३) खार पोलीस ठाणे येथील नमुद गुन्ह्यात १२ आरोपींचा सहभाग निष्पन्न झाल्याने बीएनएसएस प्रमाणे नोटिस देवून अटक करण्यात आली आहे. तसेच बीएनएसएस च्या कलम ४७ (१)(२) व ४८ अन्वये सदर गुन्ह्यातील आरोपींना समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील शिक्षकांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय भत्ता मिळणेबाबत

**(३) ३२५१ (१७-०७-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक महानगरपालिकेंतर्गत कार्यरत शिक्षकांच्या विविध संघटनांनी दिनांक १३ मार्च, २०२५ रोजी तसेच म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना यांनी आयुक्त्यांना दिनांक ६ मे २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन शिक्षकांच्या बदल्या आणि नियुक्त्यांमध्ये अनियमितता झाल्याची तक्रार केली, हे खरे आहे

काय,
(२) असल्यास, बिंदू नामावलीचा विचार न करता नियुक्त्या केल्या जाणे, पोर्टल द्वारे भरती करणे ऐवजी बाहेरच्या जिल्ह्यातील शिक्षकांना रुजू करून घेणे, मंजूर पद संख्येपेक्षा जास्त शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीने रुजू करून घेणे इत्यादी अनियमिततेची चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय, तसेच गैरमार्गाचा अवलंब करून केलेल्या अनियमिततेस आणि बेकायदेशीर कार्यवाहीस जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, नाशिक महानगरपालिकेच्या अंतर्गत कार्यरत सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैद्यकीय भत्ता वेतनामध्ये अंतर्भूत करून अदा करण्यात येतो सदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर असलेल्या शिक्षकांना मात्र इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय भत्ता देण्यात येत नाही,हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एकाच अस्थापनेवरील दोन संवर्गातील कर्मचाऱ्यांमध्ये भेदभाव करण्यामागील प्रशासनाची भूमिका काय आहे तसेच इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे शिक्षकांना वैद्यकीय भत्ता देण्याच्या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१६-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांच्या दिनांक ०७/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन प्रशासन अधिकारी यांना निलंबित करण्यात आले असून, दोषारोप पत्र तयार करण्यात आले आहे. संबंधित कर्मचारी यांच्याविरुध्द मनपा स्तरावर विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) व (४) नाशिक महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना इतर कर्मचाऱ्यां प्रमाणे वैद्यकिय भत्ता अदा करण्यात येतो. प्राथमिक शाळेतील शिक्षकांचे वेतन ५०% शासन व ५०% मनपा कडून अदा करण्यात येते, तसेच प्राथमिक शाळेतील शिक्षकांना वैद्यकिय बीले अदा करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेवर कोटयवधी रुपयांचे कर्ज थकीत असल्याबाबत

**(४) ३२९२ (१७-०७-२०२५) श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेवर रुपये १३४२ कोटींचे कर्ज असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निर्देश देऊनही महानगरपालिकेने उत्पन्न स्त्रोत्र बळकट करण्यासाठी कोणत्याही उपाययोजना केल्या नाहीत तसेच मालमत्ता व पाणीपट्टी करात दरवर्षी ८० ते ९० कोटी तूट सहन करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील विकास कामांसाठी निधीच उपलब्ध होत नसल्यामुळे महानगरपालिकेकडून उत्पन्न वाढीसाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१७-०२-२०२६) :** (१) हे, खरे नाही.

महानगरपालिकेने कळविल्यानुसार महानगरपालिकेवर एकूण रुपये २५० कोटी रुपयांचे कर्ज आहे.

(२) महानगरपालिकेतर्फे मालमत्ता व पाणीपट्टी कर वसूलीसाठी विशेष मोहिम हाती घेवून वसूली उत्पन्न वाढीचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

(३) छत्रपती संभाजी नगर शहरातील विकास कामांसाठी निधी उपलब्ध केला जातो. वर्ष २०२३-२०२४ मध्ये रुपये १२४.४७ कोटी, वर्ष २०२४-२५ मध्ये २१६.१३ कोटी विकास कामांसाठी प्रत्यक्ष खर्च करण्यात आला असून वर्ष २०२५-२६ मध्ये सप्टेंबर, २०२५ पर्यंत रुपये १६८.०६ कोटी खर्च करण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

महानगरपालिकेमार्फत कर वसूली प्रभावीपणे करता यावी यासाठी महानगरपालिका हद्दीचे दहा प्रशासकीय झोनमध्ये विभाजन करण्यात आले असून त्यात ११५ ब्लॉक करण्यात आले आहेत. ब्लॉकनिहाय वसूली कर्मचाऱ्यांची महानगरपालिकेकडून कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. मालमत्ता कर व पाणी पट्टी कर वसूलीची मागील ३ वर्षामधील वसूली खालीलप्रमाणे आहे.

वर्ष मालमत्ताकर (कोटी) पाणीपट्टी (कोटी)

२०२३-२४ १५७.२४ २८.०७

२०२४-२५ १५७.०० २६.०९

२०२५-२६ (सप्टेंबर पर्यंत) १५७.९२ १२.३२

याच सोबत महानगरपालिकेच्या मालमत्ताकरात वसूलीत वाढ होण्यासाठी कर विभागातर्फे नवीन मालमत्ता तसेच कर आकरणी न झालेल्या मालमत्ताचा शोध घेऊन त्यांच्यावर कर आकरणीची कार्यवाही महानगरपालिकेने सुरु केली आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत शास्ती से आझादी योजना कार्यान्वित असून त्याअंतर्गत शास्तीमध्ये ९५% सूट दिल्याने सुमारे रुपये ८४.०० कोटी एवढा थकीत कर भरणा महानगरपालिकेकडे जमा झाला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नागरी सुविधांच्या तक्रारींचे निराकरण करण्याबाबत

**(५) ४५४६ (१८-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकांतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणी, शाळा, रस्ते, शौचालय नागरी सुविधांबाबतच्या तक्रारींमध्ये गत १० वर्षांत ७० % वाढ झाल्याचे नुकत्याच प्रकाशित झालेल्या “मुंबईतील नागरी सुविधांची सद्य:स्थिती” या अहवालातून निदर्शनास आली असूनसन २०२४ या वर्षात मुंबईतील नागरिकांनी सुमारे एक लाखांपेक्षा अनेक तक्रारी केल्या असून प्रदूषण, शौचालय, घनकचरा संबंधी तक्रारीत ३०० टक्क्यांनी वाढ झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वच्छ भारत अभियानाच्या मापदंडानुसार एका शौचलायचा वापर ३५ पुरुष व स्त्री शौचलायचा वापर २५ स्त्रिया याप्रमाणात अपेक्षित असताना मुंबईत एका सार्वजनिक शौचालयाचा वापर

८६ पुरुष तर एका शौचालयाचा वापर ८१ स्त्रिया करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईला दैनंदिन ४३७० दशलक्ष लिटर पाणीपुरवठा होत असला तरी पाणी गळतीमुळे ३९७५ दशलक्ष लिटरच पाणी उपलब्ध होत असून झोपडपट्टीमध्ये दरडोई केवळ ४५ लीटर पाणी उपलब्ध होत असल्यामुळे झोपडपट्टीवासीयांना उर्वरित पाण्यासाठी दर महा ७५० रुपये खर्च करून टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगर पालिकेत मागील तीन वर्षापासून नागरी सुविधा व समस्यांची जबाबदारी प्रशासकावर असल्यामुळे तसेच त्यांकडे असलेल्या इतर कामांच्या भार यामुळे नागरी समस्येकडे दुर्लक्ष होत असून तक्रारींमध्ये वाढ झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, बृहन्मुंबई महानगर पालिकेतील नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करुन नागरी सुविधा व समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२०-०१-२०२६) :** (१) अंशत: खरे आहे,

प्रजा फाउंडेशन या अशासकीय संस्थेच्या वतीने "मुंबईतील नागरी सुविधांची सद्य:स्थिती" या मे, २०२५ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेल्या अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन, पाणी, शाळा, रस्ते, शौचालय या नागरी सुविधांबाबतच्या तक्रारींमध्ये सन २०१५ ते सन २०२४ या कालावधीत ७०% वाढ झाली असल्याचे नमुद केले आहे.

या अहवालानुसार सन २०२४ मध्ये १,१५,३९६ इतक्या तक्रारी प्राप्त झाल्या असून प्रदूषण, शौचालय व घनकचरा संबंधित तक्रारींमध्ये सन २०१५ च्या तुलनेत अनुक्रमे ३३४ टक्के, २१८ टक्के व ३८० टक्के इतकी वाढ झाल्याचे दर्शविण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

मुबंईमध्ये एकूण १०६८४ इतकी सार्वजनिक शौचालये असून त्यामध्ये एकूण १,५९,०३६ इतक्या शौचकुपे आहेत. मुंबईत ४६ पुरूष व ३८ महिला यांच्यासाठी प्रत्येकी १ शौचकुपे उपलब्ध आहे.
(३) अंशत: खरे आहे.

सद्य:स्थितीत मुंबई शहरास दररोज ४००० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा होत असून झोपडपट्टीमधील रहीवाशांना होणारा पाणीपुरवठा दरडोई ४५ लिटर इतका असून भारतीय मानक ब्युरो संस्थेच्या संहिता ११७३-१९९३ मधील कलम क्र. ४.१ नुसार आवश्यक असणाऱ्या दरडोई ४० लिटर पेक्षा जास्त आहे.
(४) मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकाकडून नागरी समस्यांकडे दुर्लक्ष होत नसून नागरी सोयीसुविधा मानकांनुसार उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.
(५) विविध माध्यमांद्वारे प्राप्त होणाऱ्या तक्रारींची बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नोंद घेवून स्थळ पाहणी करुन सदर तक्रारींचे त्यांच्या स्वरुपानुसार २४ ते ७२ तासांमध्ये निवारण करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील ज्येष्ठ कलाकारांना मानधन मिळत नसल्याबाबत

**(६) ४७२१ (१७-१२-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.विक्रम काळे, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने ज्येष्ठ कलाकारांना मानधन देण्याकरीता राजर्षि शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजना सुरु केली असून सदर योजनेंतर्गत चे मानधन मिळविण्यासाठी कलाकारांना ई-केवायसी (E-KYC) आणि इतर तांत्रिक प्रकिया पूर्ण करताना मोठ्या अडचणी येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील १३७ वृध्द कलाकारांचे मानधन आधार लिंकिंगच्या कारणामुळे थांबविण्यात आले असून, त्यामुळे कलाकारांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेतील तांत्रिक त्रुटी आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अनेक ज्येष्ठ कलाकारांना वर्षानुवर्षे मानधनापासून वंचित राहावे लागत असून या मानधन योजनेच्या त्रुटींची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यातील वृध्द कलाकारांचे मानधन तातडीने अदा करण्याच्यादृष्टीने आधार लिंक अथवा तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत तसेच सदर योजनेचे मानधन ज्येष्ठ कलाकारांना सुलभरित्या व पारदर्शकपणे मिळण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (०६-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे. राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेंतर्गत कलावंतांना दरमहा रुपये ५,०००/- इतके मानधन अदा करण्यात येते. सदर योजना वैयक्तिक लाभाची असून शासनाच्या धोरणानुसार वैयक्तिक लाभाची योजना ही प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रणाली अंतर्गत आणण्याचे निर्देश आहेत. त्यासाठी कलाकारांना ई- केवायसी (E-KYC) व आधार सीडींग आणि इतर तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी कलावंतांना जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती मध्ये ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच बँकमार्फत व आधार सेंटर मध्येही याबाबतची तांत्रिक प्रक्रिया पूर्ण करण्यात येतात. सदर प्रक्रिया प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) करीता आवश्यक आहे. तसेच, सद्य:स्थितीत ३८,७९० लाभार्थींपैकी ३३,८८४ कलावंताची आधार पडताळणी झालेली आहे.

(२),(३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील एकूण १,३९५ लाभार्थ्यांपैकी १,३०२ कलावंतांनी ई- केवायसी (E-KYC) व आधार सीडींग केल्यामुळे त्यांना दरमहा मानधन विहीत कालावधीचे मानधन बँक खात्यात जमा होत आहे. उर्वरीत ९३ कलावंतांचे आधार पडताळणीकरण काम सुरु असून त्यांनाही आधार पडताळणी झाल्यावर लवकरच मानधन अदा करण्यात येईल.

दिनांक १६ मार्च, २०२४ च्या शासन निर्णयान्वये योजनेत सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार आधार पडताळणी व प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण बंधनकारक करण्यात आले. तत्पुर्वी सर्व

लाभार्थ्यांना मानधन नियमित अदा करण्यात येत होते. ज्या कलावंतांनी दिनांक १६ मार्च २०२४ च्या शासन निर्णयान्वये आधार पडताळणी केली त्यांना नियमित मानधन अदा करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत माहे जानेवारी २०२६ पर्यंत मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(५) लागू नाही

---

## पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील २००० हून अधिक पदे रिक्त असल्याबाबत

**(७) ४८४४ (१४-१२-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्री.अमोल मिटकरी, श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या गृह विभागाअंतर्गत पोलीस उप निरीक्षक पदांची २००० पेक्षा अधिक पद रिक्त असताना माहे सप्टेंबर, २०२५ पूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने जाहीर केलेल्या गट-ब संयुक्त पूर्व परीक्षेच्या जाहीरातीमध्ये या पद भरतीचा उल्लेख नसल्याने आयोगाच्या भूमिकेवर विद्यार्थ्यांकडून नाराजी व्यक्त होत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२५ च्या पहिल्या आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दरवर्षी पीपीएसआय राज्यकर निरक्षक (एसटीआय) आणि सहाय्यक कक्ष अधिकारी (एएसओ) यासाठी संयुक्त पूर्व परीक्षा घेतली जाते,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सन २०१८ पासून संयुक्त परीक्षा नियमितपणे राबविण्यात येते असून सदर जाहीरातीनुसार सहायक कक्ष अधिकारी या पदाकरीता ३ जागा, राज्य कर निरीक्षक या पदाकरीता २७९ जागा, या परीक्षा दिनांक ९ नोव्हेंबर, २०२५ रोजी घेण्याचे ठरले असून पी.एस.आय.पदाला पूर्णपणे डावलले गेले असल्याने वर्षभर अभ्यास करणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पीएसआयची पदे समाविष्ट करून नवीन जाहिरात काढण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) पोलीस उपनिरीक्षक, राज्य कर निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी या पदांसाठी महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात येते.

पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची एकूण ९९८४ इतकी पदे मंजूर आहेत. त्यापैकी सरळसेवेच्या ५० टक्के कोट्यामध्ये ४९९२ पदे मंजूर आहेत. मर्यादित विभागीय परीक्षेच्या २५ टक्के कोट्यामध्ये २४९६ व पदोन्नतीच्या २५ टक्के कोट्यामध्ये २४९६ पदे मंजूर आहेत.

सरळसेवेच्या ४९९२ मंजूर पदांपैकी १८८ पदे रिक्त होती. ऑगस्ट, २०२६ पर्यंतची संभाव्य रिक्त होणारी पदे विचारात घेऊन पोलीस महासंचालक कार्यालयाकडून दिनांक ६/०८/२०२५ च्या पत्रान्वये प्राप्त झालेले ३९२ पदांचे मागणीपत्र दिनांक ११/०८/२०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगास पाठविण्यात आले. त्यानुषंगाने आयोगाने दिनांक १४/०८/२०२५ रोजी पोलीस उपनिरीक्षकांच्या ३९२ पदांकरीता

जाहिरात प्रसिध्द केली आहे व त्यानुसार दिनांक ४ जानेवारी, २०२६ रोजी महाराष्ट्र दुय्यम सेवा गट-ब (अराजपत्रित) संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ घेण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नागपूर जिल्हातील सुरक्षा रक्षकांच्या भरती प्रक्रियेस मंजूरी मिळणेबाबत

**(८) ४९५० (२२-१२-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाने दोन वर्षापूर्वी सादर केलेल्या भरती प्रक्रियेचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून सुरक्षा रक्षक भरती प्रक्रिया प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त भरती प्रक्रियेसंदर्भात शासन परिपत्रक केव्हा पर्यंत निर्गमित केले आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०५-०३-२०२६) :** (१) व (२) नागपूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामध्ये सुरक्षा रक्षकांची नोंदणी प्रक्रीया राबविण्याबाबत शासनाच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही मंडळस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## नोंदणीकृत माथाडी कामगारांना पोलीस संरक्षण मिळणेबाबत

**(९) ४९८५ (१४-१२-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मे.डिलेव्हरी लिमिटेड नं १०८ ब, कुर्ला (प) मुंबई येथे काम करीत असले माथाडी नोंदित कामगार (टोळी क्र. एम/४६३ व एम /५२३) कामासाठी कार्यरत असताना त्याठिकाणी अनोंदित कामगार व कामगार संघटनाकडून नाहक कामात अडथळे आणून त्रास दिला जात असल्याने त्यांनी पोलीस संरक्षण मिळण्याबाबत मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिरागनगर पो.स्टेंशन, घाटकोपर यांच्याकडे दिनांक २२/०९/२०२५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने नोंदित कामगार टोळीला तात्काळ पोलीस संरक्षण देण्याबाबत व दोषी टोळीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२७-०२-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी दिनांक २५/०९/२०२५ रोजी घाटकोपर पोलीस ठाण्यात बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत माथाडी कामगारांच्या प्रतिनिधींनी सद्य:स्थितीत कामाबाबत कोणतीही अडचण

नसल्याचे सांगितले. तथापि, भविष्यात अनोंदणीकृत कामगारांकडून त्रास झाल्यास तक्रार नोंदवून योग्य कायदेशीर कारवाई करण्याची ग्वाही देण्यात आली आहे. तसेच, लेखी विनंतीनुसार कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पोलीस बंदोबस्त पुरविण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व महामंडळांच्या कार्यालयाच्या प्रवेशद्वारवर माहितीचा अधिकार आणि चित्रीकरणाबाबतची नियमावली प्रदर्शित करण्याबाबत

**(१०) ५२३६ (१७-१२-२०२५) श्री.संजय केणेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्री.विक्रांत पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी नागरिकांना पारदर्शक कारभार व माहितीचा अधिकार मिळावा यासाठी शासकीय कार्यालयात फोटो व्हिडीओ चित्रीकरणासंबंधी स्पष्ट नियमावली असणे आवश्यक असून अनेक ठिकाणी नागरिकांना चित्रीकरणास मनाई केली जात असल्याने प्रशासन व नागरिक यामध्ये संघर्ष निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय व महामंडळ कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर माहितीचा अधिकार आणि चित्रीकरणाबाबतची नियमावली अनिवार्यपणे प्रदर्शित करावी अशी मागणी नागरिकांनी मा.मुख्यमंत्र्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय कार्यालयात फोटो व्हिडीओ चित्रीकरणासंबंधी स्पष्ट नियमावली करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०३-२०२६) :** (१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये नागरीकांना कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली माहिती प्राप्त करून घेण्याचा अधिकार आहे. एखाद्या कार्यालयाचे व्हिडीओ चित्रिकरण करणे ही बाब "माहिती" या सज्ञेअंतर्गत येत नाही. यास्तव शासकीय कार्यालयात फोटो-व्हिडीओ चित्रीकरणासंबंधी सष्ट नियमावली असणे हे माहिती अधिकार अधिनियमानुसार बंधनकारक नाही.
(२) होय.
(३) व (४) एखाद्या कार्यालयाचे व्हिडीओ-चित्रीकरण करणे ही बाब त्या कार्यालयाच्या सुरक्षेशी संबंधित आहे. शासकीय कार्यालयांचे व्हिडीओ चित्रीकरण करण्याची परवानगी दिल्यास त्याचा काही असामाजिक तत्वांकडून गैर वापर होऊ शकतो. यास्तव माहिती अधिकार अधिनियमाअतंर्गत एखाद्या कार्यालयाचे व्हिडीओ चित्रीकरणाची परवानगी देणे व त्याबाबत नियमावली बनविणे उचित होणार नाही.

---

## मौजा इंदरमारी (ता.आष्टी, जि.वर्धा) येथील जंगली पीर बाबा ट्रस्ट यात्रकरिता येणाऱ्या भाविकांसाठी राहण्याची सुविधा करण्याबाबत

**(११) ५२५५ (१४-१२-२०२५) श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा इंदरमारी (ता.आष्टी, जि वर्धा) येथील जंगली पीर बाबा ट्रस्ट या स्थळास "क" वर्ग यात्रा स्थळ दर्जा प्राप्त असून यात्रेमध्ये येणाऱ्या भाविक भक्तांना राहण्याची सुविधा उपलब्ध करण्यासाठी २ कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ ऑक्टोबर,२०२५ रोजी मा.पर्यटन मंत्री यांचे कडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजा इंदरमारी येथे वर्षातून दोन वेळा यात्रा भरत असल्यामुळे या ठिकाणी दर्शनासाठी हिंदू-मुस्लिम मोठ्या संख्येने येत असल्यामुळे त्यांच्या निवासाची व्यवस्था या ठिकाणी नसल्यामुळे त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी भाविक भक्तांची राहण्याची गैरसोय टाळण्याकरीता निवासस्थान बांधकामाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मौजा इंदरमारी (ता.आष्टी, जि वर्धा) येथील जंगली पीर बाबा ट्रस्ट या यात्रास्थळास "क" वर्ग दर्जा प्राप्त आहे. ग्रामविकास विभाग शासन निर्णय दिनांक १६/११/२०१२ व दिनांक २३/०२/२०२२ अन्वये "क" वर्ग दर्जा प्राप्त तीर्थक्षेत्रांना रुपये ६०.०० लक्षच्या मर्यादेत निधी मंजूर करण्याबाबतची कार्यवाही जिल्हा परिषदेमार्फत केली जाते. त्यानुसार या विभागाच्या दिनांक २३/०१/२०२६ रोजीच्या पत्राव्दारे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, वर्धा यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

उपरोक्त यात्रास्थळाच्या ठिकाणी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये रुपये २०.०० लक्ष रकमेचे भक्तनिवास बांधले आहे. तसेच, तात्पुरत्या पिण्याच्या पाण्याची व स्वच्छता गृहाची सोय इंदरमारी ग्रामपंचायत द्वारे केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील भजन मंडळांच्या अनुदान वितरणातील अडचणी व अटी शिथिल करण्याबाबत

**(१२) ५५०६ (१४-१२-२०२५) श्री.सत्यजीत तांबे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.संजय खोडके, श्री.किशोर दराडे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोककला टिकविण्यासाठी आणि पारंपारिक कलांचा वारसा पुढील पिढीकडे पोहचावा या हेतूने राज्यात आषाढी वारीनिमित्त मानाच्या १० पालख्यांबरोबरच सुमारे ११ हजार दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपयांचे अनुदान देण्यात आले असून भजनी १,८०० मंडळांना साहित्य खरेदीसाठी प्रति मंडळ २५ हजार रुपयांचे भांडवली अनुदान देण्यात येणार असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट,२०२५ रोजी वा त्यासुमारास

निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अनुदानातून मंडळानी हार्मोनियम, मृदंग, पखवाज, वीणा, तंबोरा, टाळ आदि वाद्य खरेदी करणे बंधनकारक करण्यात आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबत मंडळाने अनुदानासाठी पात्रतेचे निकष वर्षभरात किमान ५० कार्यक्रमाचे आयोजन करणे, मंडळामध्ये किमान २० सदस्य असणे व अनुदानाची कमाल मर्यादा दोन या अटीनुसार अनुदान देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण भागातील भजन मंडळांना अनुदान मिळविण्यासाठी शासनाकडून घालण्यात आलेल्या कागदोपत्री अटी व प्रक्रिया अतिशय गुंतागुंतीच्या असल्यामुळे अनेक मंडळांना प्रत्यक्षात अनुदान मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याने अर्ज दाखल करण्यासाठी शासनाने कोणते ऑनलाइन पोर्टल सुरू केले आहे तसेच आतापर्यंत शासनाकडे किती मंडळाचे अर्ज प्राप्त झाले व त्यापैकी किती मंडळांना निधी वितरीत करण्यात आला वा करण्यात येणार आहेत,
(५) असल्यास, भजनी मंडळांच्या कार्यक्षमतेत वाढ करून पारंपरिक कलांचे संवर्धन व्हावे याकरीता अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२७-०२-२०२६) :** (१) हे, अंशत : खरे आहे. " लोककला टिकवण्यासाठी आणि पारंपारिक कलांचा वारसा पुढील पिढीकडे पोहोचावा या हेतूने राज्यात आषाढी वारीनिमित्त मानाच्या १० पालख्यांबरोबरच सुमारे ११ हजार दिंड्यांना प्रतिदिंडी रुपये २० हजार अनुदान देण्यात आले आहे" ही बाब सांस्कृतिक कार्य विभागाशी संबंधित नाही.
शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ अन्वये, १८०० भजनी मंडळांना साहित्य खरेदीसाठी प्रति मंडळ रुपये २५ हजार भांडवली अनुदान देण्याची योजना घोषित केली आहे.
(२), (३), (४), (५) व (६) हे खरे आहे. शासन निर्णय दिनांक २५ ऑगस्ट, २०२५ अन्वये योजना सुरू करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सर्व अटी व शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत आणि सदर योजनेच्या अनुषंगाने संचालनालयाच्या mahaanudan.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. सदर संकेतस्थळावर दिनांक २२ ऑगस्ट, २०२५ ते ६ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत अर्ज मागविण्यात आले होते. सदर कालावधीत एकूण ९,७९५ भजनी मंडळांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. सदर अर्जांची छाननी व पात्रतेची पडताळणी प्रक्रिया सध्या सुरू आहे.

---

## भटक्या विमुक्त जाती समाजातील मुलांकरिताच्या आश्रमशाळांचे अनुदान वाढविणेबाबत

**(१३) ५५८९ (१७-१२-२०२५) श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भटक्या विमुक्त जाती कल्याण समाजातील मुलांसाठी असलेल्या आश्रम शाळांना प्रति विद्यार्थी प्रति महिना १५०० रुपये अनुदान दिले जात असून मिळणारे अनुदान अत्यंत अपुरे असल्याने महागाई निर्देशांकाप्रमाणे कमीत कमी प्रति विद्यार्थी प्रति महिना ३ हजार अनुदान मिळण्याबाबत शाळा

संस्थाचालक संघाची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्रम शाळा संस्थाचालक संघाची मागणीच्या अनुषंगाने अनुदान वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०२-०३-२०२६) :** (१) व (२) शासन शुध्दीपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दिनांक १५/१०/२०२४ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, आदिवासी विकास विभाग, महिला व बालविकास विभाग तसेच, दिव्यांग कल्याण विभाग या विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येत असलेल्या शासन मान्यताप्राप्त अनुदानित संस्थामधील प्रवेशित विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या दरमहा दरडोई परिपोषण अनुदानात रुपये १५००/- वरून रुपये २२००/- याप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांचे मानधन बैठक भत्ता वाढविण्याबाबत

**(१४) ५७१८ (१४-१२-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ च्या निर्णयानुसार सरपंच व उपसरपंचाचे मानधन दुप्पट वाढवून दिला आहे परंतु शासनाने ग्रामपंचायत सदस्यांचे मानधन वाढविण्याकडे दुर्लक्ष केले असून त्यांना फक्त रुपये २०० इतका नाममात्र बैठक भत्ता मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ग्रामपंचायत सदस्यांचे मानधन वाढवून देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.जयकुमार गोरे (०२-०३-२०२६) :** (१) ग्रामविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०६ सप्टेंबर, २०१४ अन्वये महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायत सदस्य यांना रुपये २००/- इतका प्रति बैठक भत्ता मंजूर आहे.
(२) ग्रामपंचायत सदस्यांना मानधनाबाबत कोणतीही तरतूद नसल्याने कार्यवाही बाबतचा प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत छात्रमानस योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

**(१५) ५७६९ (१४-१२-२०२५) श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर, श्री.वसंत खंडेलवाल, डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील एम.बी.बी.एस. पदवीधरांपासून तर निवासी डॉक्टरांपर्यंत होत असलेल्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालय व रुग्णालयात दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी वा त्यादरम्यान शासनाने अध्यादेश काढून छात्र मानस कक्ष स्थापन करण्याचे निर्देश दिले असतनाही या योजनेची अध्यादेश काढून जवळपास १ वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही छात्र मानस योजनेची अमलबजावणी प्रभावीपणे होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अध्यादेशानुसार या योजनेकरीता मानसशास्त्र विभागाचे प्राध्यापकांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय समिती गठित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील किती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात समिती गठित करण्यात आहे तसेच या योजनेची अमलबजावणी प्रभावीपणे होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) राज्यातील संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यरत ३५ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये समिती गठीत करण्यात आलेली आहे. तसेच, छात्रमानस योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक महाविद्यालयात एक नोडल अधिकारी नियुक्त करण्यात आले असून, २९ महाविद्यालयात मानसोपचार समुपदेशक नियुक्त करण्यात आलेले आहेत.
(४) लागू नाही.

---

## राज्यातील नव्याने स्थापन होणाऱ्या औद्योगिक व कामगार न्यायालयांच्या प्रस्तावास मान्यता देऊन पदनिर्मिती करण्याबाबत

**(१६) ६३६४ (२२-१२-२०२५) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ६ नवीन औद्योगिक व १४ कामगार न्यायालय स्थापन करण्याचा आणि आवश्यक पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव औद्योगिक न्यायालयाच्या अध्यक्षांनी राज्य शासनाला दिनांक १९ जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास सादर केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासनाच्या अधिपत्याखालील औद्योगिक व कामगार न्यायालयांमध्ये सरासरी ५१ टक्के पदे रिक्त असल्यामुळे कामगारांच्या खटल्यांच्या न्यायप्रक्रियेत विलंब होऊन हजारो कामगारांना न्यायापासून वंचित राहत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नव्याने स्थापन होणाऱ्या न्यायालयांची संख्यात्मक गरज, न्यायालयांसाठी नवीन इमारती आणि त्याबाबत सादर करण्यात आलेला अहवालास मान्यता देण्याबाबत तसेच सदरील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत, ?

**ॲड. आकाश फुंडकर (०६-०३-२०२६) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

राज्यात ६ नवीन औद्योगिक व १४ कामगार न्यायालय स्थापन करण्याचा आणि आवश्यक पदनिर्मिती करण्याचा प्रस्ताव औद्योगिक न्यायालयाच्या अध्यक्षांनी दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी सादर केला आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

औद्योगिक न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयांकरीता गट "अ" ते गट "ड" संवर्गात शासन मान्यतेने ९९१ पदे मंजूर आहेत. सदर ९९१ पदांपैकी ६२४ पदे भरलेली असून ३५७ पदे रिक्त आहेत. सबब, सद्य:स्थितीत ३६ टक्के पदे रिक्त असून सदर रिक्त पदांमुळे न्यायालयीन व कार्यालयीन कामकाजावर परिणाम होत आहे.

(३) कामगार कायदे सुलभ करण्यासाठी केंद्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने दिनांक २९ सप्टेंबर, २०२० रोजीच्या अधिसूचनेन्वये औद्योगिक संबंध संहिता, २०२० प्रसिध्द केले आहेत. या संहितेच्या कलम ९९ अन्वये समुचित शासनास औद्योगिक संबंध संहिता नियम तयार करण्याची शक्ती प्राप्त आहे. त्यानुसार या विभागामार्फत औद्योगिक संबंध संहिता मसुदा नियम, २०२१ तयार करण्यात आले आहेत. औदयोगिक संबंध संहिता, २०२० च्या कलम ४४ व ४६ या अंतर्गत औद्योगिक व कामगार न्यायालयाच्या जागी अर्धन्यायिक स्वरुपाची औदयोगिक न्यायाधिकरणे स्थापन करावयाची आहेत.

औद्योगिक न्यायाधिकरणाचे Division Bench व Single Bench करीता आवश्यक पायाभूत सुविधा, उपलब्ध पायाभूत सुविधा व अनुषंगिक आवश्यक संरचनात्मक बदल याबाबतची माहिती आवश्यक आर्थिक अंदाजासह सादर करण्याबाबत औद्योगिक न्यायालयास सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

तसेच, औद्योगिक न्यायाधिकरणाच्या स्थापनेनंतर आवश्यक पदांचा आकृतिबंध निश्चित करण्यात येणार आहे. तथापि, सद्य:स्थितीतील सरळसेवेच्या कोटयातील सहायक प्रबंधक, लघुलेखक (उच्चश्रेणी/निम्नश्रेणी)/ लघुटंकलेखक, लिपिक-टंकलेखक ही रिक्त पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर केले आहे.

तसेच, पदोन्नतीच्या कोटयातील सहायक प्रबंधक व लघुलेखक (उच्चश्रेणी) ही पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही औद्योगिक न्यायालयाच्या स्तरावरुन सुरु आहे. पदोन्नतीच्या कोटयातील लघुलेखक (निम्नश्रेणी), लघुटंकलेखक, न्यायालय लिपिक, बेलिफ, चोपदार व हविलदार/नाईक/दप्तरी या पदांवर पदोन्नतीकरीता निम्न संवर्गात पदोन्नतीस पात्र कर्मचारी नाहीत.

राज्यातील औद्योगिक व कामगार न्यायालयांचे औद्योगिक न्यायाधीकरण स्थापन झाल्यानंतर न्यायाधीकरणाची कार्यपध्दती, आवश्यक पायाभूत सुविधा, पदांची पुनर्रचना, पदांचे सेवा प्रवेश नियम इ. बाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कनिष्ठ महाविद्यालय उच्च माध्यमिक विभागातील पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी मिळण्याबाबत

**(१७) ९४८४ (२०-०७-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक विभागातील सन २०००-२००३ तसेच सन २००३-२००४ ते सन २०१७-२०१८ या कालावधीतील पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर कार्यरत असलेले शिक्षक कर्मचारी १८ ते २० वर्षांपासून मान्यतापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे सदरहू विषय अद्याप प्रलंबित राहिल्यामुळे शेकडो शिक्षक २० वर्षांपासून विनावेतन काम करीत असून यातील ३-४ शिक्षकांचे कोविड-१९ आजाराने निधन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाने वाढीव पदे मंजूर करण्याचे आदेश देऊनही पुढील कार्यवाही शासनाकडून करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू पायाभूत पदापेक्षा वाढीव पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-०३-२०२६) :** (१), (२), (३) व (४) विहीत निकषान्वये नियुक्त आणि कार्यभार उपलब्ध असलेल्या राज्यातील उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातील सन २००३-०४ ते सन २०१८-१९ या कालावधीतील वाढीव पदांवर कार्यरत असलेल्या एकूण २८३ शिक्षकांचे शासन निर्णय दिनांक ०९/११/२०२३ अन्वये समायोजन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, सन २००३-०४ ते सन २०१८-१९ या कालावधीतील वाढीव पदांवर कार्यरत असलेल्या एकूण २४९ शिक्षकांचे दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये समायोजन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील सागरी किनारा मार्गावर बेस्ट बस सेवा सुरु करण्यासाठी दिरंगाई होत असल्याबाबत

**(१८) २३१३६ (३०-०५-२०२४) श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (कोस्टल रोड) सुरु झाला असून या मार्गावरून अद्याप बेस्टची सेवा सुरु झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेस्ट बससाठी स्वतंत्र मार्गिका राखीव असतानाही बेस्टने अद्याप नियोजन केलेले नसल्याने सर्वसामान्यांचा या मार्गावरील प्रवास महाग ठरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेस्टकडे गाडयांचा अपुरा ताफा असल्यामुळे सागरी किनारामार्गावरून सेवा सुरु होत नसल्याची बाब निदर्शनास आली असून मुंबईतील नागरिकांना सागरी किनारा मार्गावरून वाजवी दरात प्रवास करता यावा याकरीता बेस्टची सेवा तातडीने सेवा सुरु करण्याकरीता शासनानी कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०३-२०२६) :** (१) (२) व (३) हे खरे नाही

दक्षिण मुंबईतील मरीन लाईन्स आणि पश्चिम उपनगरातील कांदिवली दरम्यान धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज सागरी किनारा मार्ग' (कोस्टल रोड) हा दिनांक १० मार्च २०२४ रोजी पासून वाहतूकीस खुला करण्यात आला असून मार्गावर बेस्ट उपक्रमाने या प्रवर्तनाकरीता परिक्षण बस करुन प्रवाशांच्या सोयीकरीता दिनांक १२/०७/२०२४ पासून बसमार्ग क्र. ए-७८ चे प्रवर्तन सुरू केले. तदनंतर सागरी किनारा मार्ग विहार करणाऱ्या लोकांसाठी खुला करण्यात आल्यानंतर बसथांबे व भुयारी मार्ग पूर्ण झाल्यानंतर या सागरी सेतू मार्गावरून बसमार्ग क्र.ए-८४ हा कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर सागरी किनारा मार्गावर ४ बसथांबे नव्याने देण्यात आले आहेत व दर ३५ ते ४० मिनीटांच्या प्रस्थानांतराने बसगाड्या उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुलुंड (मुंबई) येथील डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याच्या विल्हेवाटबाबत

**(१९) २३५६७ (३०-०५-२०२४) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुलुंड (मुंबई) येथील डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची विल्हेवाट लावून ते जमीन सपाटीला आणण्याच्या कामाला सन २०१८ मध्ये सुरुवात होऊनही अद्याप हे काम ३३% पूर्ण झाल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामासाठी नेमलेल्या कंपनीकडून कचरा विल्हेवाटीचे काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्यामुळे आत्तापर्यंत ७० लाख मॅट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावणे अपेक्षित असतानाही कंपनीकडून २४ लाख मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या डम्पिंग ग्राऊंडची जमीन पुनर्प्राप्त करण्याचे काम माहे जून, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असून सदरहू कामाची गती वाढविण्यासाठी महानगरपालिकेडून कोणती संयुक्त योजना राबविण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुलुंड (मुंबई) येथील डम्पिंग ग्राऊंडवरील कचऱ्याची विल्हेवाट लवकरात लवकर लावून जमिनीचे सपाटीकरण करण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
कंत्राटदाराने सुमारे ४८,१३,९९० मे. टन इतक्या कचऱ्याची विल्हेवाट लावलेली आहे व सुमारे ६८.७७% काम पूर्ण झाले आहे.
(३) हे खरे आहे.
(४) हे लागू नाही.

सदर कामाचा कंत्राट कालावधी जून, २०२५ पर्यंत पाठविण्याची बाब महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीबाबत

**(२०) २४४३७ (२५-०२-२०२५) श्री.जगन्नाथ अभ्यंकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, सन १९६८ आणि सन १९८६ ची अंमलबजावणी आवश्यक त्या आर्थिक तरतुदींसह त्याच वर्षी करण्यात आली असून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीचा कृती आराखडा ४ वर्षापेक्षा अधिक कालावधी होवूनही अद्याप तयार करण्यात आला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणी करण्याकरीता मागील ४ वर्षांत किती अतिरिक्त आर्थिक तरतूद केली व त्यापैकी किती प्रत्यक्ष विनियोग करण्यात आला, तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीचा कृती आराखडा तयार करुन आवश्यक त्या आर्थिक तरतूदीसह अंमलात आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-०३-२०२६) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यात सन २०२५-२६ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने नवीन अभ्यासक्रम, पाठ्यक्रम, पाठ्यपुस्तकांची अंमलबजावणी टप्प्या-टप्प्याने करणेबाबत १४ जुलै २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.